जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2024
पुढारी



# संशोधनासाठी विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांनी एकत्र यावे : डॉ. शिर्के

**कोल्हापूर :** भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर येथे आयोजित 'अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानातील नवीन ट्रेंडस्' या राष्ट्रीय परिषदेत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले.


परिषदेसाठी कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल आणि सिव्हील या शाखांतील २५० संशोधन निबंध प्राप्त झाले होते. त्यातील १७५ निबंध स्वीकारण्यात आले. शिक्षणतज्ज्ञ, संशोधन अभ्यासक आणि विविध विषयांतील विद्यार्थ्यांनी परिषदेत सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. विजय घोरपडे यांनी प्रास्ताविक केले. आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशिन लर्निंग विभागाच्या विभागप्रमुख शगुप्ता मुल्ला यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे मानद संचालक डॉ. एच. एम. कदम, उपप्राचार्य जे. के. पाटील आदी उपस्थित होते.

# डॉ. व्ही. एन. शिंदे यांना विज्ञान परिषदेचा सुधाकर आठले पुरस्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

विज्ञान लेखक तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना मराठी विज्ञान परिषदेकडून 'सुधाकर उद्धवराव आठले पुरस्कार-२०२४ जाहीर झाला आहे. २८ एप्रिल रोजी मुंबई येथे पुरस्कार प्रदान सोहळा होईल. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर प्रमुख पाहुणे तर परिषदेचे अध्यक्ष डॉ. ज्येष्ठराज जोशी अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती परिषदेचे कार्यवाह प्रा. भालचंद्र भणगे यांनी पत्राद्वारे दिली आहे.

महाराष्ट्रात विज्ञान प्रसार व जागृतीच्या अनुषंगाने कार्यरत असलेल्या प्रतिष्ठित मराठी विज्ञान परिषदेतर्फे समाजात विज्ञान प्रसार तसेच वैज्ञानिक दृष्टीकोन



कोल्हापूर : विज्ञानलेखक तथा कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांना मराठी विज्ञान परिषदेचा सुधाकर आठले पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, डॉ. सागर डेळेकर.

रुजविण्याकरिता किमान दहा वर्षे विविध प्रकारे कार्य करणाऱ्या, पण ६० वर्षापेक्षा कमी वय असलेल्या व्यक्तीला सुधाकर उद्धवराव आठले पुरस्कार देऊन गौरविले जाते. यंदाच्या पुरस्कारासाठी डॉ. शिंदे यांची निवड झाली आहे. २५ हजार आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. एककांचे मानकरी, हिरव्या बोटांचे किमयागार, असे

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार

घडले भारतीय शास्त्रज्ञ, आवर्त सारणी व मूलद्रव्यांची दुनिया, एककांचे इतर मानकरी आणि कृषीक्रांतीचे शिलेदार ही डॉ. शिंदे यांची पुस्तके प्रकाशित आहेत. शिंदे यांच्या सत्कारप्रसंगी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. शिंदे गेली दहा वर्षांहून अधिक काळ आपली लेखणी, वाणी आणि प्रत्यक्ष कार्य या माध्यमातून विज्ञानविषयक जागृतीचे कार्य करीत आहेत. हा पुरस्कार त्यांच्या या कार्याचा गौरव आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेस केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर उपस्थित होते.

10 APR 2024
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आजपासून फुले, शाहू, आंबेडकर सप्ताह

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात बुधवारी १० ते १४ एप्रिल दरम्यान फुले, शाहू, आंबेडकर सप्ताहाचे आयोजन केले आहे. बुधवारी १० रोजी सकाळी १०.३० वाजता राजर्षी शाहू सिनेट सभागृहात या सप्ताहाचे उद्घाटन सुधाकर गायकवाड यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती आहे.

गुरूवारी ११ रोजी सकाळी १०.३० वाजता महात्मा फुले जयंती डॉ. रवींद्र ठाकूर यांचे 'महात्मा जोतीराव फुले : व्यक्ती व वाङ्मय" यावर व्याख्यान होईल. शुक्रवारी १२ रोजी सकाळी १०.३० वाजता



डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्रात वक्तृत्व स्पर्धा होतील. या स्पर्धेसाठी फुले-शाहू-आंबेडकर विचार त्रिसूत्री, अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, फुले-शाहू-आंबेडकर : आजची गरज, प्रॉब्लेम ऑफ रुपी नंतरची शंभर वर्षे, फुले-शाहू-आंबेडकर आणि स्त्री-पुरुष समानता विषय असतील.

स्पर्धा पदवी व पदव्युत्तर गटात होतील. दोन्ही गटात प्रथम पारितोषिक १ हजार रूपये मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय ७५० रूपये मानचिन्ह व प्रमाणपत्र आणि तृतीय ५००. रूपये मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

शुक्रवारी सकाळी १०.३० वाजता सीमाताई कांबळे यांचे 'वारसा बाबासाहेबांचा' यावर व्याख्यान होईल. शनिवारी १३ रोजी शाहू सिनेट सभागृहात सकाळी १०.३० वाजता 'अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा : दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर" यावर डॉ. प्रल्हाद लुलेकर मार्गदर्शन करणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी रविवारी १४ रोजी सकाळी ९.३० वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये प्रतिमा पूजन करून डॉ. आंबेडकरांना अभिवादन करण्यात येणार असल्याचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले.

10 APR 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आजपासून 'फुले, शाहू, आंबेडकर' सप्ताह

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठात उद्या, बुधवार ते रविवार (ता. १४) दरम्यान फुले, शाहू, आंबेडकर सप्ताह होणार आहे. त्याचे उद्घाटन उद्या सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सिनेट सभागृहामध्ये विचारवंत सुधाकर गायकवाड आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. गायकवाड लिखित 'दलित सौंदर्यशास्त्र' या ग्रंथाचे प्रकाशन होणार असून, या ग्रंथावर डॉ. देवानंद सोनटक्के, सचिन गरुड विचार मांडणार आहेत.

या सप्ताहात दुसऱ्या दिवशी महात्मा फुले यांच्या जयंती दिवशी डॉ. रवींद्र ठाकूर यांचे 'महात्मा जोतीराव फुले : व्यक्ती व वाङ्मय' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान होईल. शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठात वक्तृत्व स्पर्धा आणि सीमा कांबळे यांचे 'वारसा बाबासाहेबांचा' या विषयावर व्याख्यान होणार आहे. 'अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा : दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर यांचे व्याख्यान राजर्षी शाहू सिनेट सभागृहात शनिवारी सकाळी साडेदहा वाजता होणार आहे.

रविवारी सकाळी साडेनऊ वाजता (ता. १४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये प्रतिमापूजन करून त्यांना अभिवादन करण्यात येईल, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2024
सकाळ

# 'घरंदाज सावली' ग्रंथावर आज विद्यापीठात परिसंवाद

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या महिला कुलसचिव डॉ. उषा इथापे यांच्या कार्य कर्तृत्वाच्या आठवणींचा पट उलगडणाऱ्या 'घरंदाज सावली : डॉ. उषा इथापे कार्य आणि आठवणी' या प्रा. डॉ. रणधीर शिंदे संपादित ग्रंथावर परिसंवाद उद्या, बुधवारी दुपारी तीन वाजता मानव्यशास्त्र सभागृहात होणार आहे. विद्यापीठातील शारदाबाई पवार अध्यासन आणि डॉ. अप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनीतर्फे परिसंवाद आयोजित केला आहे.

डॉ. उषा इथापे यांनी विद्यापीठाच्या उभारणीच्या काळात कुलसचिव म्हणून आपल्या खंबीर नेतृत्वगुणाने ठसा उमटवला. आपल्या प्रदीर्घ अशा कारकीर्दीत अनेक महत्त्वाचे उपक्रम सुरू केले. पण, काळाच्या ओघात विसर पडलेल्या डॉ. इथापे यांच्या याच कार्याच्या आठवणी या ग्रंथात डॉ. शिंदे यांनी संपादित केल्या आहेत.

माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, माणिकराव साळुंखे, डॉ. राजन गवस, प्राचार्य किसनराव कुराडे, डॉ. रणधीर शिंदे यांच्या उपस्थितीत व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, संयोजक डॉ. सी. टी. पवार यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2024
पुढारी

# विद्यापीठात आज शारदाबाई पवार अध्यासनातर्फे परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ शारदाबाई पवार अध्यासन व डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. १०) दुपारी ३ वाजता मानव्यशास्त्र सभागृहात परिसंवाद होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या महिला कुलसचिव डॉ. उषा इथापे यांच्या कार्यकर्तृत्वाच्या आठवणींचा पट उलगडणाऱ्या 'घरंदाज सावली : डॉ. उषा इथापे कार्य व आठवणी' या प्रा. डॉ. रणधीर शिंदे संपादित ग्रंथावर परिसंवाद होणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूरचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस, प्राचार्य किसनराव कुराडे, डॉ. रणधीर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, संयोजक डॉ. सी. टी. पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2024
पुढारी

# ‘सारथी’मार्फत विद्यापीठात स्टार्टअप उद्योग सुरू करण्याची मिळणार संधी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात ‘सारथी’मार्फत मराठा उमेदवारांना स्टार्टअप उद्योग सुरू करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) द्वारे सर सेनापती संताजी घोरपडे सारथी उद्योजकता विकास (इनक्युबेशन) उपक्रमांतर्गत विद्यापीठ एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन इनक्युबेशन सेंटरच्या माध्यमातून नवउद्योजकीय संकल्पनावर आधारित उद्योगांच्या उभारणीसाठी प्रशिक्षण व आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. उपक्रमासाठी मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील प्रत्येक नवउद्योजकांची निवड एका वर्षासाठी करण्यात येणार आहे. उपक्रमाची माहिती ‘सारथी’ संस्थेच्या https:/// sarthi-maharashtragov.in किंवा www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर भरावी, असे आवाहन नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचार्य संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2024
पुढारी

# राष्ट्रीय युवा महोत्सवात विद्यापीठ संघास २ सुवर्ण, ३ रौप्यपदके

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

३७ वा राष्ट्रीय युवा महोत्सव पंजाब कृषी विद्यापीठ, लुधियाना (पंजाब) येथे झाला. युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ संघाने दोन सुवर्ण व ३ रौप्यपदके मिळवून दमदार कामगिरी केली.

राष्ट्रीय युवा महोत्सवात विद्यापीठाचा २९ सदस्यांचा संघ सहभागी झाला होता. पोस्टर मेकिंग (प्रथम क्रमांक), व्यंगचित्र (प्रथम) रॅली (द्वितीय), पश्चिमात्य समूहगीत (द्वितीय), एकांकिका (द्वितीय) क्रमांक मिळवला. स्पर्धेत सहभागी २ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक व १५ विद्यार्थांना रौप्यपदक प्राप्त झाले. महोत्सवामध्ये देशभरातील १३८ विद्यापीठांनी सहभाग घेतला. संघासोबत विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह संघव्यवस्थापक म्हणून डॉ. संगीता पाटील, डॉ. लक्ष्मीकांत वेळेकर, विजय इंगवले उपस्थित होते. महोत्सव विद्यापीठ संघास कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2024

पुण्यनगरी

# 'सारथी'तर्फे विद्यापीठात स्टार्टअप सुरू करण्याची संधी

**कोल्हापूर :** छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) संस्थेद्वारे 'सरसेनापती संताजी घोरपडे सारथी उद्योजकता विकास उपक्रम' अंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन या इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून नवउद्योजकीय संकल्पनेवर आधारित उद्योगांच्या उभारणीसाठी प्रशिक्षण व आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. उपक्रमासाठी मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील प्रत्येक नवउद्योजकांची निवड एका वर्षासाठी करण्यात येणार आहे.

उपक्रमासाठी विद्यार्थ्यांकडे स्वतःची तंत्रज्ञान व्यवसाय कल्पना असावी व एका वर्षामध्ये त्याने त्याच्या कल्पनेचे रूपांतर स्टार्टअपमध्ये करणे आवश्यक आहे. उपक्रमाची माहिती सारथी संस्थेच्या, तसेच शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती डॉ. सागर डेळेकर यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 APR 2024
तरुण भारत

# सारथीतर्फे मराठा उमेदवारांना विद्यापीठात स्टार्टअपची संधी

**कोल्हापूर :** छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) संस्थेद्वारे मराठा समाजातील युवकांना उद्योगासाठी प्रशिक्षण व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या सुविधा "सर सेनापती संताजी घोरपडे सारथी उद्योजकता विकास (इनक्युबेशन) उपक्रम" अंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या एसयुके रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट फौंऊडेशनतर्फे देण्यात येतील. मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील प्रत्येक नवउद्योजकांची निवड एका वर्षासाठी निवड करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांकडे स्वतःची तंत्रज्ञान व्यवसाय कल्पना असावी. एका वर्षात त्याने त्याचा कल्पनेचे रूपांतर स्टार्टअपमध्ये करणे आवश्यक आहे. या उपक्रमाची माहिती सारथी संस्थेच्या https□//

sarthi□maharashtragov.in eEkeÀJee www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर न्यूज अँड इव्हेंटस्‌मध्ये सारथी अॅप्लीकेशन २०२४ मध्ये गुगल फॉर्मवर १६ एप्रिलपर्यंत भरावी. अधिक माहितीसाठी विद्यापीठाशी संपर्क साधावा, असे आवाहन नवोपक्रम, नवसंशोधन संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी केले आहे.